# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.03.2025** **वार-रविवार**

---

**गुढी पाडवा**

नववर्ष प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याचा सण आज सर्वत्र आनंद आणि उत्साहात साजरा करण्यात येत आहे. पुणे शहर परिसरात आज सकाळ पासूनच विविध मंदिरात विशेष पूजाअर्चा होत आहे; तर घरोघरी गुढ्या उभारण्यात आल्या होत्या. आज समारंभा पूर्व क ध्वज पूजन करून विविध मंदिरांवर ध्वजारोहण करण्यात आलं. साडेतीन मुहूर्तापैकी एक असणाऱ्या या मुहूर्तावर घर, वाहन खरेदीसह नवीन उद्योग व्यवसायाच्या शुभारंभ केला गेला. आज वासंतिक नवरत्नाचाही प्रारंभ होतो; पुण्यातल्या तुळशी बाग राम मंदिरासह विविध राम मंदिरात राम नवमीच्या कार्यक्रमांची सुरुवात आज पासून झाली.

**रासने**

ठाणे आणि मुंबईच्या धरतीवर पुणे शहरातल्या पेठांमधल्या जुन्या वाड्यांच्या पुनर्विकासातले अडथळे दूर करण्याचा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृह निर्माण विभागाला दिला असल्याची माहिती आमदार हेमंत रासने यांनी दिली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळात उपस्थित केलेले प्रश्न आणि चर्चेतील सहभागाबद्दल, पत्रकार परिषदेत घेऊन रासने यांनी माहिती दिली. शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दोन महत्वाकांक्षी भुयारी मार्ग करण्याच्या मागणीबाबतही बैठक होऊन, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्याचं त्यांनी सांगीतलं. तसचं पोलीस आणि महापालिका कर्मचारी वसाहतींचा पुनर्विकास, ससूनच्या बाह्य रूग्ण विभागातील अडचणी अशा अनेक प्रश्नांवर अधिवेशनात आवाज उठवल्याचं त्यांनी सांगितलं.

**नवीन 40 एसटी बस**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून, पुणे विभागाला नवीन 40 बस मिळाल्या आहेत. स्वारगेट, शिवाजीनगर, इंदापूर आणि बारामती या चार विभागात प्रत्येकी 10 बस देण्यात असून त्यामुळे

उन्हाळी सुट्टीत प्रवाशांची  सोय होणार आहे. पुढील काही दिवसांत विभागातील सर्वच आगारांत नव्या बस दाखल होणार असल्याच पुणे विभागीय वाहतूक अधिकारी सचिन शिंदे यांनी सांगितले .

**तक्रार निवारण कक्ष**

पुणे महापालिकेच्या आयुक्त कार्यालयात, तक्रार निवारण कक्ष सुरू करण्यात येणार आहे. याद्वारे दर सोमवारी आणि गुरुवारी अतिरिक्त आयुक्त नागरिकांच्या तक्रारी सोडवतील अशी माहिती आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी पत्रकारांना दिली.

**उड्डाण पूल**

पिंपरी चिंच वड महापालिकेच्या वतीने, डेअरी फार्म इथं सुरू असलेल्या उड्डाणपूलाच काम 55 टक्के पूर्ण झाले असून हा पूल खुला झाल्यानंतर पिंपरीतील डेअरी फार्म, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी आणि पिंपरी गावातील नागरिकांना सुविधा, सुरक्षितता आणि इंधन बचतीच्या दृष्टीने फायदा होणार आहे. तसचं पुणे मुंबई महा मार्गावर तसेच तुकाराम नगर मेट्रो स्टेशन पर्यंत जलद आणि सहज पद्धतीने प्रवास करण्यासाठी मदत होणार आहे.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात, आज गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर देवगड आणि रत्नागिरी हापूस आंब्याच्या जवळपास चार हजार पेट्यांची आवक झाली.  मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत, हा पूस आंब्याचे दर अद्यापही अवांक्या बाहेर आहेत. तयार हा पूस आंब्याला प्रति डझन हजार ते बाराशे रूपयांचा भाव मिळाला असून कर्नाटक मधूनही जवळपास 400 पेट्या आंब्याची आवक झाली. बाजार समितीच्या आवारात आज नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक आणि मागणी टिकून असल्याने जवळपास सर्वच फळभाज्यांचे भाव स्थिर आहेत. फळ बाजारात पपईची मोठी आवक झाल्याने भावात घसरण झाली.  फुल बाजारात फुलांची मोठी आवक झाली असून मागणी वाढल्याने पारंपारिक आणि शोभिवंत फुलांचे भाव 20 ते 30 टक्के पर्यंत वाढले आहेत.

**हिंद वी स्वराज्य**

हिंद वी स्वराज्य शपथ दिना निमित्त, पुण्यातल्या भोर इथल्या श्री क्षेत्र रायरेश्वर इथं ये त्या 4 एप्रिलला विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवर आणि एकनाथ शिंदे, खासदार उदयनराजे भोसले आदींची प्रमुख उपस्थिती असणार असल्याची माहिती स्वराज्य भूमी प्रतिष्ठानं दिली आहे.

**नाटक**

नाटक हे जिवंतपणाचे लक्षण असून व्यक्तिमत्व विकासाचे मोलाचे साधन आहे. शालेय वयातील मुलांशी बा नाट्याविषयी चर्चा केल्यास ती स्वार्थाने प्रगल्भ होतील, असं प्रतिपादन वंदेमातरम् चे अभ्यासक, बालनाट्य चळवळीतील मार्गदर्शक मिलिंद सबनीस यांनी पुण्यात केलं. नाट्य संस्कार कला अकादमी तर्फे 5 ते 16 वर्षे वयोगटातील मुलांसाठी नाट्य कार्य शाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्य शाळेच्या समारोप समारंभात ते बोलत होते. सुरुवातीला कार्य शाळेतील मुलांनी विविध नाटिका, नाट्यछटांचे सादरीकरण केले.

**हवामान**

आज सकाळ पासूनच आकाश ढगाळ असून कमाल तापमान 39 तर किमान तापमान 21 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्या आकाश अंशत: ढगाळ राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतामध्ये, नमस्कार.**